क्र.साप्रवि/मभाक/सा.आ. /न.क्र.७७ /
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
*मुंबई - ४०० ०१९.*

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ७४ (म.भा.क.) दिनांक १८/९/२००६

विषय : शासन व्यवहारात मराठीचा वापर करण्याबाबत, तसेच अधिका-यांचे नामफलक मराठीतून लिहिण्याबाबत.

संदर्भ : महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या अवर सचिवांचे पत्र क्र.संकीर्ण-२००६/ सं.क्र.१०५४/ऊर्जा-२, दिनांक १९.८.२००६.

----------

दैनंदिन प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा १०० टक्के वापर करण्याचे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे. मराठी भाषेच्या वापराबाबतचे महाराष्ट्र शासनाचे हे धोरण शासनाच्या अधिपत्याखालील मंडळे, महामंडळे यांनाही लागू असल्याने तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळानेही हे धोरण अंगीकारले होते. हेच धोरण महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळाच्या विभाजनानंतरच्या महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनीसही लागू आहे.

२. कंपनीच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजातही, वर्जित प्रयोजने वगळता मराठी भाषेचा वापर प्रामुख्याने होणे अपेक्षित आहे. यास्तव सर्वांना विनंती करण्यात येते की मराठी भाषेच्या दैनंदिन वापराबाबतच्या शासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे दि.१९.८.२००६ चे पत्र व त्यासोबतच्या शासनाच्या दिनांक १०.१.१९६१, दि.१८.५.१९८२ आणि दि.१८.७.१९८६ च्या संबंधित परिपत्रकांच्या प्रतीही सर्वांच्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी या सोबत जोडल्या आहेत.

सहपत्र : वरीलप्रमाणे

(सही)
***मुख्य महाव्यवस्थापक (क)***

प्रति
महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.

*F.N.77-Circular*

प/१

मध्यवर्ती नोंदणी विभाग
आवक क्र. २९७८
दिनांक 25/8/06

मुख्य महाव्यवस्थापक (वि) म.रा.वि.वि.कं.लि. मुंबई 4355 31/08/06

# महाराष्ट्र शासन

MD/D/3871 28/8/06

क्र.संकीर्ण २००६/सं.क्र.१०५४/ऊर्जा-२
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय,मुंबई-४०००३२.
दिनांक:-१९.८.२००६

प्रति,

व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधार कंपनी लि.,
प्रकाशगड, वांद्रे (पूर्व),मुंबई-४०००५१.

DY. G.M. (P). INWARD NO.: 42 DATE: 2/9/2006

महावितरण मुंबई
साग्रवि ८ र.व.का.
आवक/जावक
नंबर: 48
दिनांक: 1/9

व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.,
प्रकाशगड, वांद्रे (पूर्व),मुंबई-४०००५१.

व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि.,
प्रकाशगड, वांद्रे (पूर्व),मुंबई-४०००५१.

व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि.,
प्रकाशगंगा, वांद्रे (पूर्व),मुंबई-४०००५१.

मुख्य अभियंता (विद्युत),
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नवीन प्रशासकीय इमारत,रामकृष्ण चेंबूरकर मार्ग,
चेंबूर (पूर्व),मुंबई-४०००७१.

महाव्यवस्थापक,
महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण,
म्हाडा कमर्शियल कॉम्प्लेक्स,येरवडा,
पुणे ४११ ००६.

विषय - शासन व्यवहारात मराठीचा वापर करण्याबाबत तसेच अधिका-यांचे नामफलक मराठीतून लिहिण्याबाबत.

उपरोक्त विषयावरील सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.मभावा २००६/(२२/मु.मं.)प्र.क्र.३५/२०-ब, दि.१९.७.२००६ ची प्रत सहपत्रासह माहिती व योग्य त्या उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

(मोहन पांढरकामे)
शासनाचे अवर सचिव

C G M (T/E)
G. M. (P)
G. M. (HR&RC)
G. M. (DC.)
G. M. (ESTT.)
G. M. (INSPN)
C. E. O. (HRD)

circular-All

CGM (P)

# महाराष्ट्र शासन

क्र.मभावा-२००६/(२२/मु.मं.)प्र.क्र.३५/२०-ब,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :१९.७.२००६

प्रति,

सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय : **शासन व्यवहारात मराठीचा वापर करण्याबाबत तसेच अधिकाऱ्यांचे नामफलक मराठीतून लिहिण्याबाबत.**

संदर्भ : १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. ओएफएल-१०६१/एम, दिनांक १० जानेवारी १९६१
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मभावा-१०८०/प्र.क्र.५४-२०, दिनांक १८ मे १९८२
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मभावा-१०८६/४३४/प्र.१६१/८६/वीस-ब, दिनांक १८ जुलै १९८६

महोदय,

संदर्भाधीन परिपत्रकाद्वारे वर्जित प्रयोजने वगळता सर्व शासकीय कामकाज मराठीतून करण्याबाबत तसेच अधिकाऱ्यांचे नामफलक मराठीतून लिहिण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर परिपत्रकाकडे आपले पुन्हा एकदा लक्ष वेधण्यात येत आहे. या परिपत्रकाच्या प्रती सोबत जोडल्या आहेत. सदर परिपत्रकामधील सुचनांनुसार शासकीय कामकाज मराठीतून करण्याबाबत तसेच अधिकाऱ्यांचे नामफलक मराठीतून लिहिण्याबाबत कार्यवाही करावी त्याचबरोबर आपल्या विभागाच्या अधिपत्त्याखालील सर्व कार्यालयांमधून सदर परिपत्रकातील सुचनांनुसार काटेकोरपणे कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात अशी विनंती आहे.

आपला,

(प्र.मा.माळवदकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

Name Boards of Officers Manner of displaying the - in Government Offices.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
General Administration Department,
Circular No.OFL-1061-M,
Sachivalaya, Bombay, 10th January 1961.

## CIRCULAR

Government has been considering how the names of officers should be written on the boards exhibited outside their Cabins. The matter has since been examined and it has been decided that the name boards of officers should be written in the manner indicated below with immediate effect :-

1) The prefixes " Shri, Shrimati and Kumari" should not be used.
2) The initials of an officer in English alphabet should not be transcribed in Devnagari Script.
3) The surname of the officer should be preceded by this initials.
4) In the case of female officer, her first name and surname should be written and her father's or husband's initial may be mentioned in between, if she so desires.

2. Accordingly the name boards of officers should be written as illustrated below.

| Name of Officer | The manner in which the name boards to be displayed. | | |
|---|---|---|---|
| a) Shri Hari Narayan Apte | ह,ना,आपटे | and not | एच,एन,आपटे |
| b) Shri Fazal Hussain Khan | फा,हु,खान | and not | एफ,एच,खान |
| c) Shri A.Parmeshwar Iyer | अ,प,अय्यर | and not | ए,पी,अय्यर |
| d) Shri Teckchand Kessumal Hiranandani | टे,के,हिरानंदानी | and not | टी,के,हिरानंदानी |
| e) Shri Rameshchandra Agarwal | र,चं,अगरवाल | and not | आर,सी,अगरवाल |
| f) Shri Chittaranjan Das | चि,रं,दास | and not | सी.आर,दास |

A:

g) Shri Sudarshansing Majithiya सु.सिं,मणीथीया and not एस,एस,मणीथीया

h) Smt.Rekha Ramchandra Chitre रेखा चित्रे and not रेखा रा, चित्रे

3. As regards Ministers, Dy.Ministers and Secretaries to Government, it is left to their discretion whether to continue the present style of their name boards or to make a change over as indicated above.

4. Attention of all Secretariat Department and Heads of Departments and Offices under their Administrative control is invited to Government Circular, General Administration Department No.OFL-1061/M dated the 30th October, 1961 and they are requested to use the Marathi equivalents of the designations as given in the appended list only, whenever necessary

By order and in the name of Governor of Maharashtra.

Sd/-
Director of Language
Government of Maharashtra,
General Administration Department,

To,

The Secretary to the Governor,
The Private secretary to the Chief Minister,
The Personal Assistants to the all Ministers and Deputy Ministers,
The Registrar, High Court, Appellate Side, Bombay (by letter)
The Prothonotary and Senior Master, High Court, Bombay (By letter)
The Secretary, Maharashtra Public Service Commission (By letter)
All Departments of the Secretariat,
All Commissioners of Divisions,
All Collectors,
All Other Heads of Departments and Offices under the Several Department of the Secretariat.

शासन व्यवहारात मराठीचा वापर

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक : मभावा-१०८०/प्र.५४/२०
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १८ मे, १९८२.

# परिपत्रक

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम (१९६४) खाली करण्यात आलेल्या नियमानुसार काही वर्जित प्रयोजने वगळता शासन व्यवहारात मराठीचा वापर करणे शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर बंधनकारक आहे. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, एका नगरपालिका, परिषदेने राजभाषा मराठीतून पत्रव्यवहाराचा आग्रह धरला असता, शासनाच्या एका उच्च पदस्थ अधिकाऱ्याने राजभाषा अधिनियमातील तरतूदींकडे संपूर्ण दुर्लक्ष करुन त्या नगरपालिका परिषदेशी इंग्रजीतून पत्रव्यवहार चालू ठेवण्याचा हट्ट धरला. त्यामुळे शासनाला कठोर टीकेला तोंड द्यावे लागले आहे. शासनाने या बाबीची गंभीर दखल घेतलेली आहे व संबंधितांच्या विरुध्द कडक कार्यवाही करण्यात येत आहे.

शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा १९८५ पर्यंत १००% वापर करण्याचे उद्दिष्ट शासनाने ठरविले असून दिनांक ११ मार्च, १९८२ रोजी राज्यपालांनी विधिमंडळाच्या संयुक्त बैठकीपुढे केलेल्या अभिभाषणातही त्याचा उल्लेख केलेला आहे. राजभाषाविषयक शासनाचे धोरण विचारात घेऊन शासकीय कामकाजात राजभाषेचा कटाक्षाने व जाणीवपूर्वक वापर करण्याच्या सूचना शासनाने वेळोवेळी दिलेल्या आहेत. तथापि, त्या संदर्भात विविधी सबबी सांगण्यात येतात. उदा.मराठी लघुलेखक व टंकलेखक यांची उणीव, मराठी टंकलेखक यंत्रांची कमतरता, नियम पुस्तिका मराठीतून उपलब्ध नसणे इत्यादी मराठी लघुलेखक व टंकलेखक यांची उणीव, मराठी टंकलेखन यंत्रांची कमतरता, नियम पुस्तिका मराठीतून उपलबध नसणे इत्यादी मराठी लघुलेखक व टंकलेखक यांची उणीव दूर करण्यासाठी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : मभावा-१०७९/१२, दिनांक २ मे, १९७९ अन्वये लघुलेखक, लघुटंकलेखक व टंकलेखक या संवर्गातील ५०% पदे मराठी लघुलेखक, लघुटंकलेखक व टंकलेखक यांच्या नियुक्तीनेच भरण्यात यावीत असे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच शासन सेवेतील इंग्रजी लघुलेखक व टंकलेखक यांना मराठी लघुलेखनाचे व मराठी टंकलेखनाचे प्रशिक्षण देण्याची जी योजना अस्तित्वात आहे. ती सक्तीची करण्याबाबतचा प्रश्न विचाराधीन आहे. मराठी टंकलेखन यंत्रांची शासकीय कार्यालयात जाणवणारी कमतरता विचारात घेऊन प्रत्येक कार्यालयाने एकूण टंकलेखन यंत्रांच्या ५०% मराठी टंकलेखन यंत्रे घ्यावीत असेही आदेश शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : मभावा-१०७८/३४६/२८, दिनांक ९ जून, १९८० अन्वये दिले आहेत. तसेच भाषा संचालनालयाने सर्व विभागांना समान असलेल्या बहुतेक नियमपुस्तिकांचा मराठी अनुवाद करुन संबंधित विभागांना दिलेला आहे. तरी सर्व मंत्रालयीन विभागांनी व इतर कार्यालयांनी मराठी लघुलेखक व टंकलेखक यांची भरती करणे, सेवेत असलेल्या इंग्रजी लघुलेखक, लघुटंकलेखक व टंकलेखकांना जास्तीत जास्त संख्येने मराठी लघुलेखक व टंकलेखनाचे प्रशिक्षणासाठी नियमितपणे पाठविणे, तसेच जास्तीत मराठी टंकलेखन यंत्रे विकत घेणे याबाबतच्या शासकीय आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे. या आदेशांचे पालन न झाल्यास, संबंधित विभागांच्या आस्थापना

अधिकाऱ्यांना व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येईल. राजभाषेचा वापर न करण्याबाबत कोणतीही सबब यापुढे ऐकुन घेतली जाणार नाही.

शासनाकडे किंवा शासनाच्या दुय्यम प्राधिकाऱ्यांकडे आलेल्या पत्रांना / अर्जांना मराठीतून उत्तरे देण्यात यावीत असे जे आदेश शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एमआयएस-१०७८-११७-अठरा (र. व का.), दिनांक १३ सप्टेंबर, १९७९ अन्वये सर्व शासकीय कार्यालयांना देण्यात आलेले आहेत त्यांचे कटाक्षाने पालन सर्व संबंधितांनी करावे अशा सूचना देण्यात येत आहेत.

वर्जित प्रयोजने वगळता इतर बाबतीत संयुक्तिक कारणे नसताना राजभाषा मराठीचा वापर करण्याच्या संदर्भात जे अधिकारी किंवा कर्मचारी टाळाटाळ करतील त्यांच्या गोपनीय अभिलेखात आवश्यक ती नोंद घेण्यात यावी, अशा सूचना सर्व कार्यालय प्रमुख व विभाग प्रमुखांना देण्यात येत आहेत. तसेच वारंवार समज देऊनही जे अधिकारी किंवा कर्मचारी राजभाषेचा वापर करण्याच्या नियमांचे पालन करणार नाहीत. त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी अशा सूचना विभाग प्रमुखांना देण्यात येत आहेत.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

सही/-

( न.वे.सुंदररमण )

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री / उप मंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहाय्यक,
सर्व सचिव, मंत्रालयीन विभाग,
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई ( पत्राने ),
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई (पत्राने),
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
अध्यक्ष, माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा मंडळ, पुणे,
महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील सर्व मंडळे / महामंडळे,
आयुक्त, मुंबई कामगार कल्याण मंडळ, मुंबई,
निरनिराळया मंत्रालयीन विभागांखालील इतर सर्व विभागाध्यक्ष व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई ( याच धर्तीवर प्रसिद्धीपत्रक काढावे या विनंतीसह),
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यालये,
निवड फाईल ( २ प्रती )

प/e

**शासन व्यवहारात संयुक्तिक कारण नसताना मराठीचा वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या विरुध्द कारवाई करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय क्रमांक : मभावा-१०८६/४३४/प्र.क्र.१६१/८६/वीस-ब

मंत्रालय मुंबई - ४०० ०३२, दिनांक १८ जुलै, १९८६.

पहा :- १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : मभावा-१०८०/प्र.क्र.५४-२०, दिनांक १८ मे, १९८२.

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : मभावा-१०८३/१३५८/२०, दिनांक २८ डिसेंबर,१९८३.

**निर्णय :-** महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ व त्याखाली करण्यात आलेल्या नियमानुसार काही वर्जित प्रयोजने वगळता, सर्व शासकीय कामकाज मराठीतून करावे असे आदेश शासनाने वेळोवेळी दिलेले आहेत. एवढेच नव्हे तर वर्जित प्रयोजनात न मोडणाऱ्या कामकाजातही संयुक्तिक कारण नसताना राजभाषा मराठीचा वापर करण्याच्या संदर्भात जे अधिकारी/ कर्मचारी टाळाटाळ करतील त्यांच्या गोपनीय अभिलेखात नोंद घेण्यात यावी व वारंवार समज देऊनही जे अधिकारी वा कर्मचारी नियमानुसार राजभाषेचा वापर करणार नाहीत, त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करावी असेही आदेश दिलेले आहेत. तसेच राजभाषा मराठीचा वापर करण्या संदर्भातील शासन आदेशाचे, शासकीय कार्यालये व विभाग यांनी, काटेकोरपणे पालन न केल्यास विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना जबाबदार धरण्यात येईल असेही आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. राजभाषा मराठीचा शासन व्यवहारात संपूर्ण वापर होण्यासाठी खंबीर धोरण स्विकारुन खालील उपाययोजना करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. सूचना देऊनही मराठीचा वापर करण्याबाबत ज्या शासकीय अधिकाऱ्यांकडून / कर्मचाऱ्यांकडून सुधारणा होत नाही. अशा शासकीय अधिकाऱ्यांच्या /कर्मचाऱ्यांच्या बाबतीत निम्नलिखित कारवाई केली जाईल.

**प्रशासनीय कारवाई**

१) लेखी ताकिद

२) गोपनीय अभिलेखात नोंद

**शिस्तभंगविषयक कारवाई**

३) ठपका ठेवणे

४) एक वर्षाकरिता बढती रोखणे किंवा एक वर्षाकरिता पुढील वेतनवाढ रोखणे.

A.G.R.

~~उपरोक्त कारवाया क्रमशः वापरण्यात याव्यात म्हणजे अनुक्रमांक १ ची ताकिद देऊनही~~

[illegible]

8

उपरोक्त कारवाया क्रमशः वापरण्यात याव्यात म्हणजे अनुक्रमांक १ ची ताकिद देवूनही सुधारणा न आढळल्यास अनुक्रमांक २ चा अवलंब करावा. त्याचाही उपयोग न झाल्यास अनुक्रमांक ३ मधील ठपका ठेवणे, या क्रमाने कारवाया कराव्यात. तसेच ठपका ठेवणे, वेतनवाढ रोखणे किंवा बढती रोखणे या शिक्षा महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ नुसार द्यावयाच्या असल्यामुळे हया गौण शिक्षा त्या नियमांच्या नियम १० प्रमाणे कार्यपध्दती अनुसरुन म्हणजे प्रथम नोटीस देऊन त्याचे उत्तर लक्षात घेऊन नंतर शिक्षा देणे ही कार्यपध्दती अवलंबवावी.

३. विभाग प्रमुख /कार्यालय प्रमुख यांनी मराठीचा वापर पूर्णतया होतो की नाही हे पाहण्यास काही शैथिल्य दाखविल्यास त्यांना जबाबदार धरले जाईल असे उपरोक्त दिनांक २८ डिसेंबर, १९८३ च्या शासन परिपत्रकामध्ये पूर्वीच नमूद केले आहे. शासनाने आता असे ठरविले आहे की, विभाग प्रमुखांनी/ कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकारी/कर्मचारी शासन व्यवहारात मराठीचा वापर करतात की नाहीं हे पहाणे व जे करत नसतील त्यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्याबद्दलची योग्य ती कार्यवाही करणे या दोन्ही बाबतीत त्यांच्याकडून काही कसूर दिसून आल्यास "पर्यवेक्षिय शैथिल्य" (सुपरवायझरी ब्लॅकनेस) म्हणून त्यांचे विरुध्द शिस्तभंग कारवाई केली जावी.

४. विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी परिच्छेद ३ मधील आदेशांची स्वतः नोंद घ्यावी व परिच्छेद २ मधील आदेश त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व अधिकाऱ्यांच्या /कर्मचाऱ्यांच्या विविक्षितपणे निदर्शनास आणून द्यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

वि.ति.चारी

शासनाचे अपर मुख्य सचिव.

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,
मुख्य मंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक, राजभवन, मुंबई,
सर्वमंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, लोकआयुक्त/उपलोकआयुक्त, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, नवीन विधान भवन, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने).

G.R. 6A.